९.५५
२९-०७-२०२२
आ. क्र.

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

महानगरपालिका मुख्यालय, उल्हासनगर-४२१००३
moh.umc2@gmail.com

दि. २९/०७/२०२२

## प्रेसनोट

शासनाच्या निर्देशानुसार १५ ऑगस्ट,२०२२ रोजी भारताच्या स्वातंत्र्य दिनास ७५ वर्षे पुर्ण होत असल्याने स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करण्याच्या उद्देशाने तसेच हर घर तिरंगा अभियान अंतर्गत उल्हासनगर महानगरपालिका मुख्यालयात मा. आयुक्त, अजीज शेख, मा. अतिरीक्त आयुक्त डॉ. करूणा जुईकर तसेच मा. अतिरीक्त आयुक्त जमीर लेंगरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरण विभागातर्फे दिनांक २८ जुलै, २०२२ रोजी जागतिक निसर्ग संवर्धन दिन साजरा करण्यात आला.

जागतिक निसर्ग संवर्धन दिनानिमित्त आगामी साजरे होणारे सण, उत्सव लक्षात धेवुन प्लास्टर ऑफ पॅरीस ( पि.ओ.पि.) पासुन तयार केल्या जाणा-या मुर्त्यांचा वापर करू नये त्याऐवजी शाडू/लाल मातीपासून तयार केलेल्या मुर्त्यांचा वापर करावा तसेच दिनांक १ जुलै, २०२२ पासुन एकल वापर प्लास्टीक बंदी केली असल्याने यामध्ये बंदी केलेल्या प्लास्टीक कटलरी वस्तु, थर्माकोलच्या वस्तु यांचा वापर करू नये याबाबत जनजागृती करण्यात आली.

जागतिक निसर्ग संवर्धन दिनानिमित्त उल्हासनगर-४ येथील एस.एस.टी. महाविलायातील विद्यार्थ्यांमार्फत हर घर तिरंगा अभियानअंतर्गत तिरंग्याचे महत्त्व सांगून पर्यावरणाविषयी जनजागृतीकरीता पथनाटय सादर करण्यात आले. तसेच महापालिका सभागृहामध्ये ७५ दिव्यांग मुलांचा सहभाग घेवुन मानवी तिरंगा तयार करून त्यांच्यासमवेत हरीत शपथ घेण्यात आली.

सदर कार्यक्रमाचे नियोजन उल्हासनगर महानगरपालिकेचे उप- आयुक्त (पर्यावरण) डॉ. सुभाष जाधव, पर्यावरण विभागच्या विभागप्रमुख श्रीम. विशाखा सावंत, लिपीक श्री. सयाजी घाटविसावे यांनी केले. तसेच सदर कार्यक्रमामध्ये महापालिकेचे शहर अभियंता, नगररचनाकार, मुख्य लेखा अधिकारी, उप- आयुक्त (मुख्यालय) तसेच इतर सर्व महापालिका अधिकारी उपस्थित होते.

सदर कार्यक्रमासाठी वालधूनी नदी स्वच्छता समितीचे प्रमुख शशिकांत दायमा, पालवी कर्णबधीर शाळेचे दिव्यांग विद्यार्थी, शिक्षक व पालक तसेच दिव्यांग मुलांसाठी कार्यरत असणारी सोहम फाउंडेशन या संस्था विशेष सहभागी झाल्या होत्या.

२९/०७/२२

जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत –माहितीस्तव सादर.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.
१. पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२. सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका